पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दि. ११/१२ /२०२०**

**पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. १० (पुरवणी)**
**डिसेंबर २०२०**

**शुक्रवार,दि.१८/१२/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावांच्या सूचना (नोटीसा) मा.सभासदांकडून आलेल्या आहेत.**

**:– मा. सभासदांचे प्रस्ताव –:**

**विषय क्र.१८७**

संदर्भ – मा. साईनाथ संभाजी बाबर यांची सूचना दि.२२/१०/२०२०

––––

प्रभाग क्र. २७ मध्ये समान पाणीपुरवठा योजना अंतर्गत कोंढवा खुर्द येथील शिवनेरीनगर येथे पाण्याची टाकी बांधण्यात आली असून सदर पाण्याच्या टाकीचे उद्घाटन 'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.ना.श्री. राजसाहेब ठाकरे' यांचे शुभहस्ते करण्यात यावे.

**विषय क्र.१८८**

संदर्भ – मा. उल्हास उर्फ आबा बागूल, पक्षनेते, काँग्रेस यांची सूचना दि.२७/१०/२०२०

––––

पुणे महानगरपालिकेची दरमहा मा. मुख्य सभा बोलविण्यात येते. मुख्य सभा तहकूब झाल्यानंतर राष्ट्रगीत लावले जाते. वेळोवेळी मुख्य सभेमध्ये सभा तहकूबी मांडली असता ती तहकूबी स्विकारली जाते अगर फेटाळली जाते, यापैकी काही वेळा मुख्य सभेत तहकूबी मांडल्यानंतर गोंधळ झाल्यास तसेच काही वेळा अन्य कारणाने गोंधळ झाल्यास (उदा. विविध आंदोलने) त्यामध्येच राष्ट्रगीत चालू केले जाते असे सध्याच्या काळात अनेकवेळा घडल्याचे निदर्शनास येत आहे.

तसेच राज्यातील अन्य महापालिका व नगरपालिकांमध्ये देखील अशा घटना घडत आहेत. राष्ट्रगीत चालू होताना सभागृहाच्या दारात, बाहेर, पोर्चमध्ये कोणीही कोणत्याही दिशेला कसेही उभे असते असे चित्र वारंवार निदर्शनास येत आहे.

राष्ट्रगीताच्या वेळी सर्वांनी आपापल्या ठरलेल्या योग्य जागेवर सावधान मध्ये उभे राहणे बंधनकारक असल्याने राष्ट्रगीत चालू होत आहे, ही बाब राष्ट्रगीत चालू होणेपूर्वी कळणे अपेक्षित आहे. यामुळे सर्वांना राष्ट्रगीत चालू आहे हे कळेल, सबब राष्ट्रगीताचा सन्मान देखील राखला जाईल. गोंधळाच्या परिस्थितीत नकळत चुकीच्या पध्दतीने राष्ट्रगीत चालू केल्याने राष्ट्रगीताचा अपमान होत असल्याने याबाबत गांभीर्याने दक्षता घ्यावी. सबब राष्ट्रगीत चालू करताना सर्वांना आधीच सूचित करणेस मान्यता दयावी. याबाबत मा. नगरसचिव यांना आदेश देण्यात यावे.

**विषय क्र.१८९**

संदर्भ – मा.योगेश मुळीक, मा. राहुल भंडारे, मा.अनिल टिंगरे, मा. संदिप जऱ्हाड, मा.सौ. सुनिता गलांडे, मा. बापूराव कर्णे (गुरुजी), मा. सौ.ऐश्वर्या जाधव, मा.सौ.श्वेता खोसे–गलांडे, मा.सौ.शितल सावंत व मा. सौ. मुक्ता जगताप यांची सूचना दि.२७/१०/२०२०

––––

पुणे महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आलेल्या भामा आसखेड प्रकल्पाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे शुभहस्ते आणि भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष, मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली व पुण्यनगरीचे खासदार मा. श्री. गिरीषजी बापट साहेब आणि वडगाव शेरी माजी आमदार मा. श्री. जगदीशजी मुळीक व मा. महापौर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये करण्यात यावे.

**<u>विषय क्र.१९०</u>**

संदर्भ – मा. सौ. आरती सचिन कोंढरे, मा. सम्राट थोरात व मा. सौ. विजयालक्ष्मी हरिहर यांची सूचना दि.५/११/२०२०

----

दरवर्षी पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांच्या आंतरशालेय स्पर्धा होत असतात. या क्रीडा स्पर्धांना महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रातील मानाचा असलेला छत्रपती पुरस्कार प्राप्त आतंरराष्ट्रीय कबड्डी खेळाडू स्व. अशोकराव विठ्ठलराव कोंढरे यांचे नाव देण्यात यावे. या आंतरशालेय क्रीडा स्पर्धा यापुढे " **कबड्डीपटू स्व. अशोकराव विठ्ठलराव कोंढरे आंतरशालेय क्रीडा स्पर्धा** " या नावाने आयोजित केल्या जाव्यात.

**<u>विषय क्र.१९१</u>**

संदर्भ – मा.मारूती ( नाना ) सांगडे व मा.सौ.ऐश्वर्या जाधव यांची सूचना दि.७/१२/२०२०

----

प्रभाग क्र.१ मधील धानोरी सर्व्हे नं.३८/१ येथील नव्याने विकसित करण्यात येत असलेल्या आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण केंद्राचे भूमीपूजन महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते मा.देवेंद्रजी फडणवीस यांचे शभुहस्ते व पुणे शहरातील सर्व केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्यांचे मंत्री तसेच खासदार, आमदार,पक्षनेते यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात यावे. सदर कार्यक्रमाच्या आयोजनाचे सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत.

**<u>विषय क्र.१९२</u>**

संदर्भ – मा.श्रीमती रंजना टिळेकर यांची सूचना दि.७/१२/२०२०

----

प्रभाग क्र.४१ कोंढवा बु.येवलेवाडी कोंढवा बु.स.नं.४७ येथील केदारेश्वर पाण्याच्या टाकीचे उद्घाटन मा.श्री.चंद्रकांतदादा पाटील,प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते तसेच मा.श्री.गिरीषजी बापट, खासदार, पुणे व स्थानिक मा.आमदार मा.श्री.योगेशअण्णा टिळेकर यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये आणि मा.महापौर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात यावा.

**<u>विषय क्र.१९३</u>**

संदर्भ – मा.सौ.संगीता ठोसर व मा.पृथ्वीराज सुतार,पक्षनेते, शिवसेना यांची सूचना दि.९/१२/२०२०

----

प्रभाग क्र.४१ब,कोंढवा बु.येवलेवाडी बु.स.नं.४७ येथील केदारेश्वर पाण्याच्या टाकीचे उद्घाटन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.निलमताई गोऱ्हे यांच्या शुभहस्ते , माजी खासदार ,शिवसेना उपनेते मा.श्री.शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व माजी आमदार महादेव बाबर यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात यावा. याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत.

**( टिप – विषय क्र.१८७ ते १९३ हे दि.९/१२/२०२० च्या पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झाले आहेत.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–११/१२/२०२०.

**प्र.नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**